# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO २१००१:२०१८) (ISO/IEC २७००१:२०२२)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१३२

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : secretary@msbte.ac.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४०/DEC/ फोटोकॉपी / पुनर्मूल्यांकन/२०२६/ 196 दिनांक: 19 JUN 2026

**विषय: Digital Evaluation पद्धतीने गुणमूल्यांकन झालेल्या विषयांचे फोटोकॉपी / पुनर्मूल्यांकन (Re-Evaluation) बाबतचे वेळापत्रक व महत्वाच्या सूचना.**

मंडळामार्फत उन्हाळी २०२६ परीक्षेमधील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांचे गुणमूल्यांकन Digital Evaluation पद्धतीने करण्यात आले आहे. Digital Evaluation पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना प्राप्त प्रश्ननिहाय गुणांची बेरीज संगणकीय पद्धतीने अचूक करण्यात आली आहे. त्यामुळे Digital Evaluation पद्धतीने गुणमूल्यांकन झालेल्या विषयांकरिता गुणपडताळणीची आवश्यकता नसल्यामुळे गुणपडताळणी हि सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तरी Digital Evaluation पद्धतीने गुणमूल्यांकन झालेल्या विषयांकरिता फोटोकॉपी / पुनर्मूल्यांकन (Re-Evaluation) या दोनच सुविधा सदर विद्यार्थ्यांना उपलब्ध राहतील. त्याबाबतचे वेळापत्रक तसेच महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**(अ) Digital Evaluation पद्धतीने तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांकरीता फोटोकॉपी मिळविण्याबाबतचे वेळापत्रक**

**कालावधी दि. २०.०६.२०२६ ते ०२.०७.२०२६**

| अ.क्र. | कार्यवाही | कालावधी व दिनांक |
|---|---|---|
| १) | फोटोकॉपी करीता विद्यार्थ्यांनी Student Login द्वारे अर्ज सादर करण्याचा कालावधी | २०.०६.२०२६ ते २२.०६.२०२६ |
| २) | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीचे सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमत: निश्चित करण्याचा कालावधी | २०.०६.२०२६ ते २३.०६.२०२६ |
| ३) | विभागीय कार्यालयांनी RBTE Login द्वारे संस्थांनी निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज विभागीय कार्यालयाद्वारे अंतिमत: निश्चित करण्याचा कालावधी. | २०.०६.२०२६ ते २४.०६.२०२६ |
| ४) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या फोटोकॉपी अर्जानुसार संबंधित DEC केंद्रांना Inventory उपलब्ध करून देण्याचा दिनांक | २५.०६.२०२६ |
| ५) | DEC केंद्राने मंडळाच्या निर्देशानुसार मूळ उत्तरपत्रिकांमधील गुणांची पडताळणी करून कन्फर्म करण्याचा कालावधी | २५.०६.२०२६ ते २९.०६.२०२६ |
| ६) | विद्यार्थी लॉगिन तसेच संस्थेच्या लॉगिन मध्ये फोटोकॉपी उपलब्ध करून देण्याचा कालावधी | ०२.०७.२०२६ |
| ७) | फोटोकॉपी निकाल **Student Login, Institute Login** व **RBTE Login** मध्ये जाहीर करण्याचा दिनांक | ०२.०७.२०२६ |

**(ब) Digital Evaluation पद्धतीने तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांकरीता पुनर्मूल्यांकन (Re-Evaluation) बाबतचे वेळापत्रक**

**कालावधी दि. ०३.०७.२०२६ ते २४.०७.२०२६**

| अ.क्र. | कार्यवाही | साधारण पुनर्मूल्यांकनाचा कालावधी व दिनांक |
|---|---|---|
| ८) | विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या पुनर्मूल्यांकनाकरीता Student Login द्वारे अर्ज सादर करावयाचा कालावधी | ०३.०७.२०२६ ते ०५.०७.२०२६ |
| ९) | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज कन्फर्म करण्याचा कालावधी | ०३.०७.२०२६ ते ०६.०७.२०२६ |
| १०) | विभागीय कार्यालयाने RBTE Login द्वारे संस्थांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी | ०३.०७.२०२६ ते ०७.०७.२०२६ |
| ११) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या पुनर्मूल्यांकन विषयांच्या अर्जानुसार मंडळाने निश्चित केलेल्या RDEC केंद्रांना Inventory उपलब्ध करून देण्याचा दिनांक | ०८.०७.२०२६ |
| १२) | मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार RDEC ने पुनर्मूल्यांकनाची कार्यवाही करून कन्फर्म करण्याचा कालावधी. | ०८.०७.२०२६ ते ११.०७.२०२६ |
| १३) | पुनर्मूल्यांकनाचा निकाल online पद्धतीने जाहीर करण्याचा दिनांक | १५.०७.२०२६ |
| १४) | मंडळाद्वारे फोटोकॉपी / पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणानुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | १६.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ |
| १५) | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | १८.०७.२०२६ |
| १६) | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | २४.०७.२०२६ |

**महत्त्वाच्या सूचना :**

१) संस्थांनी उपरोक्त वेळापत्रक सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

२) विद्यार्थी तसेच संस्थेकरिता फोटोकॉपी **Application Form** सुलभतेने भरण्याकरिता सोबत **User Manual** देण्यात आले आहे.

३) विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या कालावधीत अर्ज भरुन संस्थेमार्फत आवश्यक शुल्क भरुन विहित कालावधीत निश्चित करणे आवश्यक आहे.

४) संस्थांनी वेळापत्रकानुसार निश्चित केलेले सर्व अर्ज आवश्यक शुल्क भरुन विभागीय कार्यालयात निश्चित करणे आवश्यक आहे.

५) विद्यार्थ्यांनी प्राप्त फोटोकॉपी मधील गुणांमधले बदल असल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांमार्फत संबंधित विभागीय कार्यालयाकडूनच सदर प्रकरणाचा पाठपुरावा करून गुणबदल करणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्याने फोटोकॉपीमधील गुणांमध्ये बदल असल्यास अ. क्र. (५) नुसार कार्यवाही न करता **Re-Evaluation** चा अर्ज केल्यास फोटोकॉपीमधील गुणांत बदल ग्राह्य धरला जाणार नाही व **Re-Evaluation** मध्ये मिळालेले गुण अंतिम गुण म्हणून ग्राह्य धरले जातील, हि बाब संबंधित विद्यार्थ्यांना **Re-Evaluation** साठी अर्ज करण्यापूर्वी प्रकर्षाने जाणीव करून देण्यात यावी.

७) संस्थेने विद्यार्थ्यांचा पुनर्गुणमुल्यांकनाचा (**Re-Evaluation**चा) अर्ज निश्चित करण्याआधी विद्यार्थ्यांची उन्हाळी 2026 ची मंडळाद्वारे देण्यात आलेली मूळ गुणपत्रिका संस्थेत जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच पुनर्गुणमुल्यांकनाचा अर्ज निश्चित करावा.

८) वरीलप्रमाणे जमा केलेल्या सर्व मुळ गुणपत्रिका एका बंद लिफाफ्यामाध्ये संबंधित विभागीय कार्यालयाकडे जमा करून पोहोच घ्यावी. त्याशिवाय विभागीय कार्यालयाकडून अर्ज निश्चित केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.